# University of Mumbai

संलग्नता विभाग

तात्काळ/हस्ते बटवडा/ऑनलाईन

क्र. संलग्नता/आयसीई/२०१७-१८/१४

दि.२८/०७/२०१७

## परिपत्रक

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून संलग्नीकरणाबाबतचे सर्व प्रस्ताव / अर्ज ऑनलाईन सादर करणेबाबत.**

**संदर्भ** :- १.परिपत्रक क्र. संलग्नता / आयसीसी/२०१६-१७/२३, दि. ३० डिसेंबर, २०१६

२. परिपत्रक क्र. संलग्नता/ आयसीसी/२०१६-१७/३१ दि. २ मार्च, २०१७

विद्यापीठ सलग संलग्नीत / कायम संलग्नीत / स्वायत्त (Continuation / Permanent /Autonomous) असलेल्या सर्व महाविद्यालये / संस्था यांचे प्राचार्य / संचालक यांना विनिर्दीष्टीत परिपत्रकानुसार सूचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठीचे सलग संलग्नीकरणाचे / नैसर्गिक वाढीचे / कायम संलग्नीकरणाचे प्रस्ताव ऑनलाईन प्रणालीद्वारे सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रस्ताव ऑनलाईन सादर करण्याकरिता खालील सूचनांचे पालन करावे.

**सूचना :-**

१) विद्यापीठाचे https://muonline.org.in या संकेत स्थळावर संबधित प्रस्तावांचे विभाग (Section) मध्ये (उदा. Activate Link of Continuation of affiliation Proposal-2018-19) लिंक देण्यात आलेल्या आहेत. या लिंक द्वारे महाविद्यालये आपल्याला आवश्यक त्या अर्जाच्या लिंक सुरु ( Activate) करू शकतील.

२) आवश्यक त्या अर्जाची लिंक प्राप्त झाल्यानंतर अर्जाच्या सुरुवातीला संलग्नीकरणासंबधीत मागणी करीत असलेल्या अभ्यासक्रम / तुकडी इत्यादीचा तपशील ऑनलाईन अपडेट करावा.

३) आपण ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेल्या अभ्यासक्रम / तुकड्यांनुसार आपल्याला संलग्नीकरण शुल्क भरण्या करण्याकरिताची लिंक निर्धारित शुल्कासह उपलब्ध होईल. निर्धारित शुल्क याची खातरजमा प्राचार्यांनी / संचालकांनी केल्यानंतरच ऑनलाईन पद्धतीने संलग्नीकरण शुल्क भरावे. तदनंतरच ऑनलाईन अर्जाच्या पुढील भागात प्रवेश करता येईल.

४) ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर अर्जाची एक प्रत (Hard Copy) संलग्नता विभागात ऑगस्ट महिन्याच्या अखेरच्या दिवशी (सायंकाळी ४ :०० वा. पर्यंत) सादर करण्यात यावी.

५) ऑनलाईन अर्ज सादर करण्याबाबतच्या विस्तृत सूचना https://muonline.org.in या संकेत स्थळावरील Proposal Guidelines for Current Academic Year या लिंक द्वारे उपलब्ध करण्यात आलेले आहेत.

६) उपरोक्त उल्लेखित ऑनलाईन पद्धतीने जे अर्ज प्राप्त होणार नाहीत, अशा अर्जासंबधित महाविद्यालयामार्फत / संस्थेमार्फत करण्यात आलेल्या कोणत्याही पत्र व्यवहाराचा विचार विद्यापीठाकडून केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

(डॉ. एम.ए.खान )
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

**प्रति :**

**१) प्राचार्य / संचालक, विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये / संस्था.**

**२) संचालक, मे. निर्मल सॉफ्टवेअर सर्व्हीसेस प्रा. लि., यांना संदर्भीय क्र. २ नुसार पुढील कार्यवाहीस्तव.**